RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ४५] गुरुवार, सप्टेंबर ७, २०१७/भाद्र १६, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ८७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६.—** महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | पृष्ठे १-२ |

दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**नि. ज. जमादार,**
प्रधान सचिव व विधि परामर्शी,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ७ सप्टेंबर २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९५६ चा मुंबई ५२. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम, यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) (सुधारणा) अधिनियम, २०१७, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

राज्य विधानमंडळाचे सदस्यत्व निरर्ह ठरविण्यास प्रतिबंध.

२. कोणत्याही व्यक्तीने, ती मुख्य प्रतोद किंवा, यथास्थिती प्रतोद असे पद धारण केले आहे, केवळ ऐवढ्याच वस्तुस्थितीच्या कारणामुळे, महाराष्ट्र विधानसभेचा किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य म्हणून निवडली जाण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरणार नाही किंवा ती अशा प्रकारे निरर्ह ठरली असल्याचे कधीही मानले जाणार नाही ; आणि तद्नुसार, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियमाच्या अनुसूची एक मध्ये, नोंद २२ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :— १९५६ चा मुंबई ५२.

" **२३.** महाराष्ट्र राज्य विधानमंडळामधील मुख्य प्रतोद किंवा प्रतोद ही पदे.

**स्पष्टीकरण.**— (१) महाराष्ट्र विधानसभेच्या संबंधात, " मुख्य प्रतोद " किंवा " प्रतोद " या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्यास सरकार स्थापन करणाऱ्या पक्षाकडून, त्या त्या वेळी, त्या सभागृहातील मुख्य प्रतोद किंवा प्रतोद म्हणून घोषित करण्यात आले असेल आणि अध्यक्षाने तशी मान्यता दिलेली असेल, असा सभागृहाचा सदस्य असा आहे ; आणि त्यात विधानसभा सभागृहातील एकूण सदस्य संख्येच्या किमान दहा टक्के सदस्य असणाऱ्या पक्षाकडून त्या त्या वेळी, त्या सभागृहातील मुख्य प्रतोद किंवा प्रतोद म्हणून घोषित करण्यात आलेला आणि अध्यक्षाने तशी मान्यता दिलेल्या सदस्याचा अंतर्भाव होतो ; आणि

(२) महाराष्ट्र विधान परिषदेच्या संदर्भात " मुख्य प्रतोद " किंवा " प्रतोद " या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्यास सरकार स्थापन करणाऱ्या पक्षाकडून, त्या त्या वेळी, त्या सभागृहातील मुख्य प्रतोद किंवा प्रतोद म्हणून घोषित करण्यात आले असेल आणि सभापतींनी तशी मान्यता दिली असेल, असा सभागृहाचा सदस्य असा आहे ; आणि त्यात विधान परिषद सभागृहातील एकूण सदस्य संख्येच्या किमान दहा टक्के सदस्य असणाऱ्या पक्षाकडून त्या त्या वेळी, त्या सभागृहातील मुख्य प्रतोद किंवा प्रतोद म्हणून घोषित करण्यात आलेला आणि सभापतींनी तशी मान्यता दिलेल्या सदस्याचा अंतर्भाव होतो.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.